मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 27 एप्रिल 2026 | पान- 1

# पावसाळ्यातील नैसर्गिक आपत्ती हाताळण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती...

## नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पूरनियंत्रण, मदतकार्य आणि त्वरित समन्वयासाठी महापालिकेची विशेष यंत्रणा सक्रिय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवू शकणाऱ्या परिस्थितीत नागरिकांना तात्काळ मदत मिळण्यासाठी तसेच अशी परिस्थिती हाताळण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उप आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून तर अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने याबाबत आदेश जारी करण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि आपत्तीच्या वेळी तात्काळ प्रतिसाद मिळावा, यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.

पावसामुळे शहरात गंभीर पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे रक्षण करणे आणि नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत मदत पोहोचविणे आवश्यक आहे. यासाठी क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उपआयुक्त या पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून व अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नोडल अधिकाऱ्यांनी पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई यासारख्या कामकाजाची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा. तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील पूरनियंत्रण आराखड्यानुसार आपत्ती व्यवस्थापन, स्थापत्य, पाणीपुरवठा, आरोग्य, अग्निशमन, वैद्यकीय व विद्युत विभागाशी समन्वय साधून पूरनियंत्रण व आपत्कालीन सेवा सुरळीतपणे पार पाडाव्यात, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.




### नोडल अधिकारी व त्यांचे संपर्क क्रमांक

- » उप आयुक्त ममता शिंदे – अ क्षेत्रीय कार्यालय – ८४५९५३१५२०
- » उप आयुक्त राजेश आगळे– ब क्षेत्रीय कार्यालय – ९५५२५११९७२
- » उप आयुक्त अण्णा बोदडे – क क्षेत्रीय कार्यालय – ९९२२५०१९४२
- » उप आयुक्त सिताराम बहुरे – ड क्षेत्रीय कार्यालय – ९९२३९८९७७४
- » उप आयुक्त पंकज पाटील– इ क्षेत्रीय कार्यालय – ८३८०८१७८०६
- » उप आयुक्त संदीप खोत – फ क्षेत्रीय कार्यालय – ७७२२०६०९२६
- » उप आयुक्त चेतना केरुरे – ग क्षेत्रीय कार्यालय – ९४२०४८४८३१
- » उप आयुक्त व्यंकटेश दुर्वास – ह क्षेत्रीय कार्यालय – ७७४४०००६६८

### नियंत्रण अधिकारी व त्यांचे संपर्क क्रमांक

- » अतिरिक्त आयुक्त (१) – अ, ब,क क्षेत्रीय कार्यालय – ९२७१०५७१०१
- » अतिरिक्त आयुक्त (२) – ड, इ क्षेत्रीय कार्यालय – ९८९२९८६०९५
- » अतिरिक्त आयुक्त (३) – फ,ग,ह क्षेत्रीय कार्यालय – ८६००११२३१३

# पावसाळ्यापूर्वी हिंजवडीतील नालेसफाई, रस्ते दुरुस्तीला गती द्या!..!

## महानगर आयुक्तांचे प्रशासनाला आदेश; आमदार शंकर मांडेकरांसह 'आयटी' परिसराची पाहणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

माहिती तंत्रज्ञान नगरी (आयटी हब) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडी आणि लगतच्या गावांमध्ये पावसाळ्यात उद्भवणारी वाहतूक कोंडी व पाणी साचण्याच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. हिंजवडी, माण आणि मारुंजी परिसरात पावसाळ्यापूर्व कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.



स्थानिक आमदार शंकर मांडेकर आणि विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसह महानगर आयुक्तांनी शनिवारी (२५ एप्रिल) या भागाचा सविस्तर पाहणी दौरा केला. मुळशी तालुक्यातील हिंजवडी, माण, मारुंजी, भूगाव आणि पिरंगुट या पट्ट्यात पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था आणि अपूर्ण नालेसफाईमुळे नागरिकांना दरवर्षी मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर परिसरातील सर्व नैसर्गिक ओढे व नाले अतिक्रमणमुक्त करून त्यांच्या सफाईची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश महानगर आयुक्तांनी दिले. विशेषतः 'नांदे चौक' येथील पावसाळी जलवाहिन्यांचे (स्टॉर्म वॉटर ड्रेनेज) काम प्राधान्याने मार्गी लावण्यास त्यांनी सांगितले. (उर्वरित पान २ वर)


> "पावसाळा सुरू होण्यापूर्वी आयटी पार्क आणि लगतच्या रहिवासी क्षेत्रांतील रस्ते, नाले आणि पावसाळी पाणी व्यवस्थापनाची कामे चोख असणे आवश्यक आहे. नागरिकांना पावसाळ्यात त्रास होऊ नये, यासाठी कामांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन प्रशासनाला सूचना दिल्या आहेत."
>
> - डॉ. अभिजीत चौधरी, महानगर आयुक्त, पीएमआरडीए.

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या देशातील पहिल्या स्मारकाची पिंपरीत मुहूर्तमेढ..!

## केंद्रीय गृहराज्यमंत्री रामदास आठवले आणि भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते होणार भूमिपूजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहचारिणी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या देशातील पहिल्या स्मारक उभारणीस अखेर मंजुरी मिळाली आहे. आज महापालिकेत झालेल्या पत्रकार परिषदेत महापौर रवी लांडगे यांनी येत्या २८ तारखेला पिंपरीत या स्मारकाचे भूमिपूजन केंद्रीय गृहराज्यमंत्री रामदास आठवले साहेब आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती पिंपरी चिंचवड शहर आरपीआय (आठवले) शहराध्यक्ष तथा नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात वाव्हळकर यांनी म्हटले आहे की, 'पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या शेजारील आरक्षित जागेत माता रमाई यांचे स्मारक उभारण्याची मागणी माझ्यासह महापालिकेचे नगरसेवक धर्मपाल तंतरपाळे, नगरसेवक डॉ. सुहास कांबळे, माजी नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे यांच्यासह पिंपरी-चिंचवडमधील आंबेडकरी समाजाकडून दीर्घकाळापासून होत होती. त्यासाठी वेळोवेळी प्रशासनाकडे निवेदने आणि पत्रव्यवहार करण्यात येत होता. परंतु, प्रशासनाने केवळ कागदी घोडे नाचवण्यापलीकडे काही केले नाही. अखेरीस महापालिकेत भारतीय जनता पक्ष आणि आरपीआय पक्षाची सत्ता आल्यावर त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या स्मारकाचा प्रश्न तातडीने निकाली निघाला आहे, असेही ते म्हणाले.

चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रशासकीय राजवटीतील भ्रष्टाचारामुळे महापालिकेच्या तिजोरीत खडखडाट असल्याने स्मारकाचा प्रश्न रेंगाळण्याची चिन्हे होती. याची चाहूल लागताच पक्षाचे सर्वेसर्वा आठवले साहेब आणि आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली महापौर रवी लांडगे व स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्याकडे निधी उपलब्ध करून देण्याची आम्ही जोरदार मागणी केली. अर्थसंकल्पात तरतूद नसतानाही या स्मारकासाठी अखेरीस अर्थसंकल्पात सुधारणा करून स्मारकासाठी आवश्यक तो निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे आता स्मारकाचे काम लवकरच मार्गी लागणार आहे. दरम्यान या स्मारकाच्या उभारणीसाठी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. तसेच या कामी आमदार शंकरभाऊ जगताप, महापौर रवि लांडगे व स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचे समस्त आरपीआय पक्षाच्या वतीने आभार मानतो, असे या पत्रकात कुणाल वाव्हळकर यांनी म्हटले आहे.

### असा आहे स्मारकाचा आराखडा...

» "माता रमाई आंबेडकर यांच्या स्मारकासाठी सुमारे २५,००० चौ. फूट भूखंडावर भव्य प्रकल्प उभारण्यात येणार असून, यासाठी २३ कोटी ५५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे काम दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या स्मारकात ७.५ फूट उंचीचा भव्य पुतळा, २५ आकर्षक म्युरल्सद्वारे माता रमाई यांच्या जीवनकार्याचे दर्शन, तसेच अभ्यासिका, प्रतीक्षा गृह, सुंदर कारंजे, उद्यान आणि नागरिकांसाठी प्रशस्त बैठक व्यवस्था उभारण्यात येणार आहे. यासोबतच अत्याधुनिक विद्युत व्यवस्था देखील करण्यात येईल.

**"माता रमाई आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेला आधार, त्याग आणि समर्पण अतुलनीय आहे. त्यांच्या कष्टांमुळेच बाबासाहेबांना समाज परिवर्तनाचे महान कार्य करता आले. त्यामुळे माता रमाई यांचे योगदान हे देशाच्या इतिहासात तितकेच महत्त्वाचे आहे. स्मारक उभारणीस मंजुरी मिळणे म्हणजे त्यांच्या त्यागाची आणि संघर्षाची अधिकृत दखल घेणे होय. हे स्मारक पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल आणि समाजाला कृतज्ञतेची जाणीव करून देईल. पिंपरी-चिंचवड शहराला अशा ऐतिहासिक कार्यात सहभागी होता येत असल्याचा मला अभिमान आहे. आम्ही हे स्मारक भव्य, सुबक आणि सर्वसमावेशक पद्धतीने उभारण्यासाठी कटिबद्ध आहोत."**

**- कुणाल वाव्हळकर, पिंपरी चिंचवड शहर आरपीआय (आठवले) शहराध्यक्ष तथा नगरसेवक मनपा..**


# पवना धरणात 39% पाणी; पिंपरी-चिंचवडच्या पाणीपुरवठ्यावर ताण

## उन्हामुळे साठा झपाट्याने घटतोय; जूनपर्यंत पुरेल असा अंदाज

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात शनिवारी (दि.24) 39 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तीव्र उन्हामुळे बाष्पीभवन होत असल्याने तसेच, पाण्याची मागणी वाढल्याने धरणातील पाण्याचा साठा झपाट्याने कमी होत आहे. हा साठा पिंपरी-चिंचवड शहराला तसेच, इतर भागांना पावसाळ्यापर्यंत म्हणजे जूनअखेरपर्यंत पुरेल इतका असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणातून 30 लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडून पवना नदीवरील रावेत येथील बंधाऱ्यातून दररोज 520 एमएलडी पाणी उचलले जाते. पाण्यावर प्रक्रिया करून पिण्यायोग्य पाणी संपूर्ण शहराला पुरवले जाते. एमआयडीसीकडून 30 एमएलडी पाणी घेऊन शहरातील काही भागास पुरवले जाते. आंद्रा धरण पाणी योजनेअंतर्गत निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून दररोज 90 एमएलडी पाणी उचलून चिखली जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून त्या परिसरात पुरवले जात आहे. संपूर्ण शहराला गेल्या साडेसहा वर्षांपासून दोन दिवसातून एकदा पाणीपुरवठा होत आहे.



तीव्र उन्हामुळे बाष्पीभवन होत असल्याने, पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. धरणात शनिवारी (दि.24) 39 टक्के पाणी साठा शिल्लक आहे. पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहर, एमआयडीसी, काही नगरपालिका व ग्रामपंचयातीला पाणी दिले जाते. धरणातील तो पाणीसाठा पिंपरी-चिंचवड शहराला पावसाळ्यासुरू होईपर्यंत म्हणजे जून महिन्यापर्यंत पुरेल इतका आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पावसाळ्यापूर्वी हिंजवडीतील नालेसफाई, रस्ते दुरुस्तीला गती द्या!

{ पान १ वरून }

हिंजवडी आयटी पार्क आणि औद्योगिक वसाहतींमधील वाहनांची मोठी वर्दळ लक्षात घेता, मर्सिडीज शोरूम (राष्ट्रीय महामार्ग ४८) ते हिंजवडी फेज-१ या जोडरस्त्याचा विकास वेगाने करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच लक्ष्मी चौक, कोलते-पाटील रस्ता आणि नेरे-दत्तवाडी-जांबे येथील रस्त्यांचे रुंदीकरण व विकासाचा आढावा घेण्यात आला. 'पीएमआरडीए'च्या माध्यमातून सुरू असलेल्या 'प्राईड रोड'च्या कामाची महानगर आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा दर्जा आणि गतीबाबत समाधान व्यक्त केले.

पाहणी दौऱ्यादरम्यान हिंजवडी, माण, मारुंजी, म्हाळुंगे, नांदे, चांदे आणि जांबे या गावांतील स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगर आयुक्तांची भेट घेऊन विविध समस्या मांडल्या. या सर्व तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्या तातडीने सोडविण्याची ग्वाही महानगर आयुक्तांनी दिली. या पाहणी दौऱ्यात भोर-राजगड-मुळशीचे आमदार शंकर मांडेकर, 'पीएमआरडीए'चे मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी, अधीक्षक अभियंता प्रशांत पाटील, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचे सहआयुक्त (प्रभारी) हिम्मत खराडे, कार्यकारी अभियंता वसंत नाईक, सहमहानगर नियोजनकार सोनाली आहेर, तहसीलदार आशा होळकर, जिल्हा परिषद गटविकास अधिकारी सुधीर भागवत, उपअभियंता श्रीधर फणसे, पोलिस निरीक्षक नितीन अंभोरे, हिंजवडीचे ग्रामसेवक अमोल घोळवे, मुळशी तालुका पंचायत समितीचे सभापती मंदा शेळके, उपअभियंता अमित तिडके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# रस्ता खोदाईनंतर दुरुस्ती फक्त पथ विभागाकडून; पुणे महापालिकेचा निर्णय

## पुणे शहरातील खोदलेले रस्ते आता केवळ पथ विभागामार्फतच दुरुस्त केले जाणार, महापालिका आयुक्तांनी याचे आदेश जारी केले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या विविध विभागांकडून विकासकामे करण्यासाठी रस्ते खोदले जातात. मात्र, खोदलेले रस्ते बुजवून डांबरीकरण किंवा काँक्रिटीकरण करताना प्रत्येक विभाग वेगळ्या पद्धतीने काम करतो. या प्रकाराला आळा घालण्यासाठी यापुढे रस्ता खोदाईनंतर तो पूर्ववत करण्याचे काम केवळ पथ विभागामार्फतच करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक असलेला निधी संबंधित विभागांनी पथ विभागाला उपलब्ध करून द्यायचा आहे.

खोदलेला रस्ता पुन्हा बांधण्यासाठी पथ विभागाला आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करणेही बंधनकारक करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबतचा कार्यालयीन आदेश दिला आहे. याची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

महापालिका प्रशासनाच्या वतीने शहरात पाणीपुरवठा, मलनिस्सारण, विद्युत तसेच इतर अत्यावश्यक सेवांसाठी वारंवार रस्ते खोदले जातात. मात्र, रस्ते खोदाईनंतर हे रस्ते पूर्ववत करताना त्याची गुणवत्ता पाहिली जात नाही. काम करणारा ठेकेदार त्याच्या पद्धतीने आणि मर्जीनुसार खोदलेले रस्ते पुन्हा तयार करून देतो. मात्र, त्याचा दर्जा चांगला नसल्याने हे रस्ते वारंवार खराब होतात आणि त्याचा त्रास नागरिकांना आणि वाहनचालकांना सहन करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर, खोदलेले रस्ते पुन्हा त्याच पद्धतीने तयार व्हावेत, यासाठी पथ विभागाकडून हे काम करून घेणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. महापालिका आयुक्तांनी काढलेल्या आदेशानुसार, यापुढील काळात महापालिकेच्या कोणत्याही विभागाला स्वतंत्रपणे खोदलेले रस्ते दुरुस्त करण्याची कामे करण्यास परवानगी नसेल.

रस्ता खोदकामासाठी परवानगी घेण्यापूर्वी संबंधित विभागांनी हे रस्ते दुरुस्त करण्यासाठी किती खर्च होणार आहे, त्या खर्चाचा अंदाज घेऊन त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध असल्याची खात्री करून घेणे आवश्यक राहील. तसेच रस्त्यांची कामे निर्धारित कालावधीत आणि गुणवत्तेच्या निकषांनुसार पूर्ण करणे बंधनकारक असेल.

सर्व विभागांनी समन्वय साधून काम पूर्ण करणे, कामापूर्वी आणि कामानंतर एकाच पद्धतीने छायाचित्रांसह नियमित एमआयएस अहवाल सादर करणेही अनिवार्य करण्यात आले आहे.



### निधीची जबाबदारी संबंधित विभागांवर

» रस्ता खोदाईसाठी परवानगी घेण्यापूर्वी संबंधित विभागांनी दुरुस्ती खर्चाचा अंदाज तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा निधी पथ विभागाला आगाऊ उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. तसेच अर्थसंकल्पातही यासाठी स्वतंत्र तरतूद ठेवावी लागणार आहे. त्यामुळे कामे अर्धवट राहणार नाहीत आणि दुरुस्ती वेळेत होईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे. प्रत्येक विभागाने आर्थिक नियोजन करूनच रस्ता खोदाईची परवानगी घ्यावी लागणार आहे.

### रस्ता दुरुस्तीचा नवा नियम

» पुणे महापालिकेने रस्ता खोदाईनंतर तो पूर्ववत करण्यासाठी नवा नियम लागू केला आहे. यापुढे कोणताही विभाग स्वतंत्रपणे डांबरीकरण किंवा काँक्रिटीकरण करू शकणार नाही. हे काम केवळ पथ विभागामार्फतच केले जाणार आहे. यामुळे सर्व कामांमध्ये एकसमान दर्जा राखण्यास मदत होणार आहे. रस्त्यांच्या गुणवत्तेबाबत सातत्याने येणाऱ्या तक्रारी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. आयुक्त नवल किशोर राम यांनी तातडीने अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत.

### सुरक्षा व गुणवत्ता निकष कडक

» रस्ता खोदाईदरम्यान बॅरिकेड्स, सूचना फलक आणि इतर सुरक्षा उपाययोजना करणे संबंधित अभियंत्यांवर सोपविण्यात आले आहे. कामापूर्वी व कामानंतर छायाचित्रांसह एमआयएस अहवाल सादर करणेही अनिवार्य केले आहे. पथ विभागाने सुधारित एसओपीनुसार पात्र कंत्राटदारांकडून कामे करून घ्यायची आहेत. ठरलेल्या कालावधीत आणि गुणवत्ता निकषांनुसार काम पूर्ण करणे बंधनकारक असेल. यामुळे नागरिकांना खड्डे, धूळ आणि वाहतूक कोंडीचा त्रास कमी होण्याची अपेक्षा आहे.

---

# पुण्यात जाहिरात फलकांवर 'क्यूआर कोड' सक्तीचा ! अन्यथा होणार कारवाई..

## क्यूआर कोड लावणे बंधनकारक असून, तो स्कॅन केल्यावर नागरिकांना फलकाची परवाना प्रत आणि मालकी हक्काची सर्व माहिती मिळणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील बेकायदा जाहिरातफलकांना आळा घालण्यासाठी महापालिकेने कडक पावले उचलली असून, महापालिका हद्दीतील सर्व अधिकृत जाहिरातफलकांवर आता 'क्यूआर कोड' लावणे सक्तीचे करण्यात आले आहे. यामुळे संबंधित फलकाची सर्व माहिती नागरिकांना एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने हा निर्णय घेण्यात आला. यामुळे शहरातील रस्त्यांवर, तसेच चौकांमध्ये उभारण्यात येणारे अधिकृत आणि अनधिकृत जाहिरातींचे फलक ओळखणे सोपे होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या ९ मे २०२२ च्या जाहिरात नियंत्रण नियमावलीनुसार हा निर्णय घेण्यात आला असल्याचे आकाशचिन्ह विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी सांगितले.

महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत हे 'क्यूआर कोड' उपलब्ध करून दिले जाणार आहेत. प्रत्येक जाहिरात फलकाच्या खालच्या उजव्या कोपऱ्यात हा कोड स्पष्टपणे लावणे आवश्यक आहे. ज्या फलकांवर 'क्यूआर कोड' आढळणार नाही अथवा 'स्कॅन' केल्यानंतर माहिती उपलब्ध होणार नाही, असे फलक बेकायदा समजले जाणार आहेत. तसेच, ज्या जाहिरात फलकांच्या सांगाड्यावर माहितीची पाटी नसेल, त्यांच्यावर २७ मेपासून कारवाई करण्याचे आदेश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी दिले आहेत.

'क्यूआर कोड'मधील माहितीमध्ये कोणताही बदल करण्यासाठी महापालिका प्रशासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल. या संपूर्ण प्रक्रियेवर महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे नियंत्रण राहील. जे जाहिरात फलक व्यावसायिक नियमांचे उल्लंघन करतील, त्यांच्यावर कारवाई करण्याचे अधिकार सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या सहायक आयुक्तांना देण्यात आले आहेत



### क्यूआर कोडमध्ये काय?

» जाहिरात फलकावर लावण्यात आलेला 'क्यूआर कोड' मोबाइलद्वारे स्कॅन केल्यास नागरिकांना त्या फलकाची संपूर्ण माहिती मिळणार आहे. यामध्ये जाहिरात फलकाची परवाना प्रत, परवान्याचे नूतनीकरण झाले आहे का, फलकाचा मालकी हक्क कोणाकडे आहे, परवान्याची मुदत कधीपर्यंत आहे, अशी सर्व कागदपत्रे पाहता येणार आहेत.

# एल-निनोचा प्रभावामुळे पाणी पुरवठाबाबत नियोजन करा : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी


## मान्सूनपुर्व कामांचे नियोजन करुन कामे वेळेत पुर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

एल-निनोच्या प्रभावामुळे यावर्षी सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे, ही बाब लक्षात घेता जलसंपदा विभागाने पाणी पुरवठ्याबाबत नियोजन करावे. मान्सूनपुर्व करावयाचे कामांचे सुक्ष्म नियोजन करुन ती सर्व कामे पावसाळ्यापूर्वी वेळेत पूर्ण करावीत, कामे करतांना सर्व सबंधित यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय ठेवावा. असे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठकीत(दि. २४) जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी दिले.

याबैठकीत जिल्हा परिषदेचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकरी विठ्ठल बनोटे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, कृषी, आरोग्य, पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालिका, नगर परिषद, पुणे प पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय, जिल्हा पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महावितरण, प्रादेशिक परिवहन कार्यालय, जलसंपदा, एनडीआरएफ भारतीय हवामान विभागासह सर्व संबंधित विभागांचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार, मुख्याधिकारी उपस्थित होते.

संबंधित विभागाने जिल्हास्तरापासून ते गावपातळीपर्यंत आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्ययावत करुन घ्यावा. याबाबत नागरिकांना माहिती द्यावी. आजच्या बैठकीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकाऱ्यांनी तालुकानिहाय आपत्ती व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक घेवून संबंधिताना सूचना द्याव्यात. मान्सून काळात पूरबाधित गावाच्या अनुषंगाने आपत्कालीन यंत्रणा सर्व विभागांच्या समन्वयाने सज्ज ठेवावी. नागरिकांची गैरसोय टाळण्याकरिता आपत्तीच्या काळात आवश्यक त्या सर्व सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात यावे. भोर, खेड, आंबेगाव उपविभागात भुस्खलनाच्या पार्श्वभुमीवर नागरिकांचे स्थलांतर, आपदा मित्राचे प्रशिक्षण, सुसज्ज साहित्य तसेच मॉकड्रीलचे आयोजनाबाबत कार्यवाही करावी. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांची गैरसोय टाळण्याच्यादृष्टीने त्यांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा मिळतील यादृष्टीने नियोजन करावे . यावेळी सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मान्सून पूर्व तयारीच्या अनुषंगाने करीत असलेल्या तयारीबाबत माहिती दिली.



### धोकादायक ठिकाणांची तपासणी

» पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांसह सर्व नगरपरिषदांना धोकादायक इमारतींची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. अतिधोकादायक इमारतीतील नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यास सांगितले. पूरप्रवण रस्ते, पूल, गावांची पाहणी करून उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पावसाळ्यात बंद होणाऱ्या रस्त्यांसाठी पर्यायी मार्गांची माहिती नागरिकांना देण्यावर भर देण्यात आला. जिल्ह्यातील अनधिकृत जाहिरात फलक महिन्याभरात हटविण्याचे आदेशही प्रशासनाने दिले.

### पाणी नियोजनावर भर

» एल-निनोच्या प्रभावामुळे कमी पावसाची शक्यता लक्षात घेऊन जलसंपदा विभागाला काटेकोर पाणी नियोजनाचे निर्देश देण्यात आले. १५ ऑगस्टपर्यंत पुरेल असे नियोजन असले तरी २०२७ च्या फेब्रुवारी ते मे कालावधीसाठीही तयारी ठेवण्यास सांगितले. धरणांतील पाणीसाठा, विसर्ग, कालवे व नैसर्गिक जलस्रोत सुरळीत ठेवण्यावर भर देण्यात आला. नदी, नाले व कालव्यांवरील अतिक्रमणे हटविण्याचे आदेश देण्यात आले. धरणांच्या सुरक्षिततेचा आढावा घेऊन दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज

» मान्सूनपूर्व काळात सर्व विभागांनी आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्ययावत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. बुलडोझर, टँकर, डंपर, पंप, जनरेटर, ट्री कटर यांसारखी यंत्रसामग्री कार्यरत स्थितीत ठेवण्यास सांगितले. पूरबाधित गावांसाठी विशेष नियोजन करण्यासह तालुकास्तरावर बैठका घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. भोर, खेड, आंबेगाव भागातील भूस्खलनप्रवण क्षेत्रांत स्थलांतर योजना, मॉकड्रिल आणि आपदा मित्र प्रशिक्षणावर भर देण्यात आला. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक सुविधा तत्काळ उपलब्ध ठेवण्याचे आदेश दिले.

# पुण्यात शाळा इमारतींची 15 मेपूर्वी मान्सूनपूर्व तपासणी अनिवार्य

## शाळांच्या संरचनात्मक सुरक्षिततेसाठी 27 मुद्द्यांवर आधारित तपासणी करून दुरुस्तीची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या इमारती, वर्गखोल्या, स्वयंपाकगृह व स्वच्छतागृहांची प्रतिवर्षी नियमितपणे इमारतींची मान्सूनपूर्व व मान्सूनोत्तर तपासणी करणे ही अनिवार्य सुरक्षा प्रक्रिया आहे.

संबंधित मान्सूनपूर्व तपासणी दर वर्षी दि. 15 मेपूर्वी करणे आवश्यक आहे. संबंधित तपासणीमध्ये संरचनात्मक तपासणी, जलरोधक, जीर्ण झालेल्या इमारती ओळखणे यांचा समावेश करावा, असे स्पष्ट निर्देश राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प समन्वयक गोविंद कांबळे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुखांना दिले आहेत.

संबंधित संरचनात्मक तपासणी, जलरोधक तपासणी व धोकादायक व जीर्ण झालेल्या इमारतींची निश्चिती केल्यानंतर त्याबाबतचा तपासणी अहवाल तयार करून त्यानुसार करायच्या आवश्यक त्या उपाययोजनांना अंतिम स्वरूप देऊन दुरुस्ती कामे मंजुरी व आवश्यक निधी उपलब्ध झाल्यानंतर त्यानुसार आवश्यक त्या उपाययोजनांची कामे हाती घेऊन ती कामे वेळेत पूर्ण करावीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.




### पाहणीसाठी तब्बल 27 मुद्दे

» इमारती वा इतर बांधकामांमध्ये संरचनात्मक भेगा आणि कमकुवतपणा ओळखणे, धोकादायक इमारत, वर्गखोल्या व स्वच्छतागृहांचा वापर त्वरित थांबविणे, धोकादायक बांधकामे रिकाम्या करणे, कर्मचाऱ्यांचे स्थलांतरण करणे, छतामधून होणारी गळती थांबवण्यासाठी जलरोधक प्रकियेची कामे हाती घेऊन ती पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणे, शाळांच्या इमारती, वर्ग खोल्या, स्वयंपाकगृह व स्वच्छतागृहांची दुरुस्तीची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करणे, धोकादायक संरचना लवकरात लवकर पाडणे, शाळेतील इमारती, वर्ग खोल्या, स्वयंपाकगृह व स्वच्छतागृहे यांना भेगा पडल्या असल्यास त्यांची दुरुस्ती त्वरित करणे, शालेय इमारतीच्या परिसरातील खड्डे बुजविणे, शाळांच्या मुख्य प्रवेशद्वार व कुंपण भिंत यांची पाहणी करून मुख्य प्रवेशद्वार व कुंपण भिंत सुस्थितीत असल्याबाबत खातरजमा करावी, अन्यथा दुरुस्ती करावी, या प्रमुख मुद्द्यांसह तब्बल 27 बाबींची पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.